दै. पुण्यनगरी दि. 30/01/2026

# लोहा पोलिसांनी पकडला ५.२५ लाखांचा बनावट गुटखा



**नांदेड/प्रतिनिधी**

लोहा पोलिसांनी टाटा एस वाहनांतून ५.२५ लाख रुपयांचा बनावट सूर्य छाप जर्दा तंबाखू व गुटखा जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी २ आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. दि. २८ जानेवारी रोजी ही कारवाई करण्यात आली.

लोह्याचे पोलिस निरीक्षक चिंचोलकर यांना नांदेडहून लोह्याकडे बनावट तंबाखू व गुटख्याची वाहतूक होत अ

माहिती मिळाली.त्यांनी नांदेडकडे

नांदेडकडून येणारी एम.एच.०४

३५ बॉक्स बनावट सूर्य छाप जर्दा

ए नावाचा गुटखाही मिळून आला. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.या प्रकरणात शेख समेर शेख आयुनोदीन (२१, नुरी चौक गोविंदनगर नांदेड), सय्यद अमेर सय्यद महमद अली (२२, रा. खुदबईनगर चौरस्ता, नांदेड) यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून सव्वा पाच लाखांचा बनावट गुटखा व जर्दा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस हवालदार नारायण कदम यांच्या तक्रारीवरून लोहा पोलीस ठाण्यात (पान २ वर..)

## बनावट तंबाखू अन् गुटखा जप्त



लोहा पोलिसांनी नांदेड रस्त्यावर टाटा-एस. हे वाहन अडवून तपासणी केली असता त्यात सव्वापाच लाख रुपयांचा बनावट सूर्यछाप जर्दा आणि गुटखा आढळून आला. पो.नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली.

# आधीच धोकादायक, त्यात बनावट

## तंबाखू मळणाऱ्यांनो, सावधान! लाखोंचा बोगस जर्दा, गुटखा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**लोहा** : पोलिसांनी 'टाटा एस.' या वाहनातून जात असलेला ५ लाख २५ हजार रुपये किमतीचा बनावट सूर्य छाप जर्दा आणि गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई सोमवारी करण्यात आली. या प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली असून, माल जप्त केला आहे.

पोलिस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांना खबरीडून माहिती मिळाली होती. नांदेडहून लोह्याला बनावट तंबाखू आणि गुटखा घेऊन वाहन जात होते. त्यानंतर पोनि. चिंचोलकर यांनी तत्काळ एक पथक नांदेड रस्त्यावर पाठविले. तर अन्य एका रस्त्यावर दुसरे पथक थांबले होते. नांदेडकडून येत असलेली 'टाटा एस.' ही चारचाकी अडवून पोलिसांनी तपासणी केली असता, त्यात बनावट सूर्य छाप जर्दाचे ३५बॉक्स आणि विमल, आदत, एएए नावांचा गुटखा मिळून आला. यावेळी पोलिसांनी शेख समेर शेख आयुनोद्दीन (रा.नूरी चौक, नांदेड) आणि सय्यद अमेर सय्यद महमंद अली (रा.खुदबईनगर) या दोघांना पकडले आहे. पोलिसांकडून अन्य ठिकाणी या आरोपींनी बनावट जर्दा, गुटखा पुरविला आहे की काय या अनुषंगानेही तपास सुरू आहे.